# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 12/11/2022 (षनिवार) दुपार**

---

## अपघातात मृत्यू

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १० किमी. अंतरावर डुमरी फ्लायओवर कन्हान येथे दिनांक ११/११/२०२२ चे ०८.३० वा. ते ०९.४० वा. दरम्यान यातील बस चालक आरोपी नामे– बनवारीलाल सोनवाने, वय ६५ वर्ष, रा. रानी दुर्गावती चौक, नागपुर याचे अचानक बस वरून नियंत्रण सुटल्याने बस क्र. एम. एच.– ४०/सी. डी.–०६९२ ही रोडवरील कठडयाला धडकली असता बस मध्ये बसलेला प्रवासी नामे–कैलास विनायक मुन, वय ५७ वर्ष, रा. ओमकार नगर, नागपुर हा खाली पडल्याने त्याला गंभीर दुखापत झाल्याने प्रथमोपचारा करिता रामटेक येथे नेले व नंतर मेडीकल कॉलेज, नागपुर येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेन्द्र धाडुजी मेश्राम, वय ५४ वर्ष, रा. कैलास नगर, नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपी बस चालकाविरुध्द कलम २७९ ३०४ (अ) भादवी, सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहे.

**पो.स्टे. कुही**:– अंतर्गत ३०० मी. अंतरावर इंडीयन ऑईल पेट्रोलपंप समोर कुही येथे दिनांक १०/११/२०२२ चे सकाळी ०९.०० वा. ते ०९.३० वा. दरम्यान मोटरसायकलचा चालक मृतक नामे–उमेश किसनाजी मते, वय २६ वर्ष, रा. टेंभरी हा सकाळी ०९.०० वाजता सुमारास आपले मोटरसायकल क्र एम.एच.–४०/ई–७७५२ ने कुही येथे ट्रॅक्टरचे नटबोल्ट आणण्या करीता आला होता व पेंट्रोल भरून आकोली गावाकडे जात असता समोरून येणा–या एका पांढ–या रंगाच्या आरोपी टाटा सुमो चालक वाहन क्र एम.एच.–३१/सी.एम.–१२१४ च्या चारचाकी वाहनाने धडक दिल्याने मोटरसायकल चालक हा जखमी होवुन उपचारा दरम्यान शासकीय वैदयकीय महाविदयालय, नागपुर येथे मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरकारतर्फे पोलीस नाईक ग्यानीवंत गुरपुडे, ब.नं. ५४८, पोलीस स्टेशन कुही यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कुही येथे आरोपी टाटा सुमो चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी, सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कुही करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर